## मत्स्यव्यवसाय विभाग

### महाराष्ट्र शासन

# "संयुक्त सागरी मत्स्य व्यवस्थापन"





## अतिरिक्त मुख्य सचिव यांचा संदेश




जेएसएम अर्थात संयुक्त सागरी व्यवस्थापन या संकल्पनेचे मूळ 'जेएफएम' म्हणजेच संयुक्त वन व्यवस्थापनाच्या नाविन्यपूर्ण चौकटीमध्ये आहे. जास्त प्रमाणात होणारी मासेमारी, यांत्रिक बोटींचा होणारा अवाजवी वापर, स्वच्छ ऊर्जा उत्पादनाची गरज, खारफुटीचे संरक्षण आणि कृत्रिम खडकांचा उपयोग यासारख्या बहुआयामी आव्हानांना तोंड देण्यासाठी- परस्परांना सहयोगी ठरू शकणाऱ्या कृती योजनांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

सरकारने फेब्रुवारी २०२३ मध्ये 'सागर परिक्रमा' योजनेला प्रारंभ केला. यामध्ये किनारपट्टीवरील राज्ये / केंद्रशासित प्रदेशांमध्ये पूर्व-निर्धारित सागरी मार्गाने सर्व मच्छीमार, मत्स्यपालक आणि यासंबंधित भागधारकांना सहभागी करून घेवून कृती कार्यक्रमाच्या नेटक्या अंमलबजावणीसाठी आवश्यक माहिती घेण्यात आली. यामध्ये सागरी प्राणीमात्रांमध्ये शाश्वत समतोल राखला जावा आणि सागरी परिसंस्थेच्या संरक्षणावर लक्ष केंद्रीत करताना जबाबदार मत्स्यपालन पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी मत्स्यपालन संबंधित योजना आणि कार्यक्रम तयार करण्यात आले. यासंबंधी जे प्रयत्न सुरू आहेत, त्यांचे एकत्रीकरण करताना, प्रयत्नांमध्ये वाढ केली जात आहे. तसेच हे करताना सागरी समुदायाला केंद्रस्थानी ठेवले जात आहे. कारण जलचर समुदाय हे पर्यावरण संरक्षण उपायांचे अविभाज्य घटक आहे. त्यामुळे जबाबदार मासेमारीच्या पद्धतींचा प्रचार केला जात आहे. 'जेएसएम'मार्फत या सर्व घटकांना सक्रिय सहभागी करून घेत असून त्यांना सक्षम करण्याचा प्रयत्न केला  जात आहे. यामध्ये अर्थिक मदत, शैक्षणिक संसाधने उपलब्ध करु न देणे, या बाबी सुनिश्चित केले जाते. त्यामुळे या समुदायांना त्यांच्या शाश्वत उपजिविकेसाठी दिर्घकाली कायमस्वरुपी उपायांचे महत्त्व आता लक्षात आले आहे.

समुदायाबरोबर सहकार्य केले जाताना आवश्यक त्या स्थानी मत्स्य व्यवसायातील तज्ज्ञांची मदत घेवून, किनारपट्टीवरील समुदायांच्या सामूहिक ज्ञानाचा आणि संसाधनाचा वापर केला जातो. यामुळे सागरी व्यवस्थापन पद्धत अधिक सुलभ, प्रभावी आणि शाश्वत होईल, अशी संकल्पना आहे. शेवटी आपल्या महासागरांचे आरोग्य सुदृढ राखणे महत्त्वाचे आहे. कारण आपल्या पृथ्वी ग्रहाच्या कल्याणासाठी सागर देवता सर्वोपरी तयार आहे.

**श्री. राजेश कुमार** भा.प्र.से.
अतिरिक्त मुख्य सचिव (मत्स्य)
मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
दिनांक : १४.०३.२०२४

# प्रस्तावना



आपल्या सेवा काळात बचत गट, शेतकरी गट, संयुक्त वन व्यवस्थापन समिती, तसेच ग्रामस्वच्छता अभियान व जलस्वराज सारख्या प्रकल्पात जनतेच्या सहभागितेमुळे शासकीय योजनांचे यश अधिक निश्चित होत जाते हे बघितले आहे. जिल्हाधिकारी गडचिरोली असतांना वन हक्क कायद्याची अंमलबजावणी करताना संयुक्त वन व्यवस्थापन" (JFM) समित्यांची खूप मदत झाली. वने या नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन जनतेच्या सहाय्याने केल्यामुळे वनांसोबतच वन्यप्राण्यांचे सुध्दा संरक्षण व संवर्धन चांगल्याने होते. तीच संकल्पना मत्स्यव्यवसायात आणल्यास जल या संसाधनाचे व त्यासोबतच दुर्मिळ जलचरांचे जतन" संरक्षण संवर्धन होईल असे मला वाटणे. संयुक्त मत्स्य व्यवस्थापन"(Joint Fisheries Management) अंतर्गत भूजलाशयीन व सागरी दोन्हीप्रकारच्या माशांचा समावेश होतो. तलाव, नदी व समूद्र या तिन्ही जलस्त्रोतांचे संवर्धन याव्दारे होणार हा दुहेरी लाभ. मुख्य म्हणजे सागरी मत्स्य व्यवस्थापनाचा दुसरा भाग संयुक्त सागर व्यवस्थापन" joint sea management (JSM) इतका व्यापक आहे ज्यात मासेमारी करणारेच नव्हे तर जलपर्यटन, जल वाहतूक करणारे सुध्दा समाविष्ट होतील.

संयुक्त सागरी मत्स्य व्यवस्थापन अंतर्गत मत्स्य प्रजनन स्थळे निर्माण करण्यासाठी कृत्रिम शैल भित्तीका (Artificial Reefs) मच्छीमार सहकारी सोसायटी दत्तक घेत आहेत. दुसरीकडे तिलापियांचा अतिरेक थांबविण्यासाठी व जैवविधता संवर्धनासाठी काही जलाशय महाशीर (गोल्डन व डेक्कन) माशांचे अभयारण्य (Sanctuary) ही संकल्पना राबवून त्याच्या व्यवस्थापनाची जबाबदारी तेथील गावकऱ्यांस देण्यात येणार आहे.

संयुक्त सागरी व्यवस्थापन "ह्यात सागर आहे आणि सागरातील मत्स्य सोबत अन्य जलचर सुध्दा आहेत. केंद्र शासनाच्या सागर परिक्रमा अभियानात प्रत्यक्ष मासेमारी करणाऱ्या लोकांशी संवाद साधल्यावर शासकीया योजनांचे प्रारुप ठरवताना किती मदत होते हे शुध्दा मी अनुभवले आहे. विकासाच्या मार्गात विकासक आणि विकासोच्छूक आशा दोहोंचा समन्वय आवश्यक आहे. संयुक्त मत्स्य व्यवस्थापन" (Joint Fisheries Management) अंतर्गत महाराष्ट्र शासन, जनतेच्या सहभागितेतुन जल व्यवस्थाप आणि मत्स्यविकास आशा दोन्हींत संतुलन ठेवून शाश्वत विकासाकरिता जनतेशी भागिदारितेचा अभिनव उपक्रम सुरु करत आहे. याचा मला अभिमान आहे.

**डॉ. अतुल पाटणे,** भा.प्र.से.
आयुक्त मत्स्य व्यवसाय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
दिनांक : १४.०३.२०२४

# "संयुक्त सागरी मत्स्य व्यवस्थापन"

आपल्या पृथ्वी ग्रहाच्या पृष्ठभागावरील ३/४ भाग हा पाण्याने व्यापलेला आहे. यामध्ये ९७% भाग महासागरातील खाऱ्या पाण्याचा असून ३% भाग हा गोडया पाण्याने व्यापलेला आहे. पाण्याला जीवन असे म्हटले जाते. पाण्यामध्ये विविध आणि महत्त्वाचे प्राणी व वनस्पती यांचा अधिवास असतो, तसेब पाण्यामध्ये जगातील अत्र सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या अमुल्य नैसर्गिक परिसंस्थेची (Ecosystem) संतुलित प्रणाली आहे. या नैसर्गिक परिसंस्थेच्या संबंधीत जागतिक अन्न सुरक्षेसाठी मत्स्योत्पादन हा महत्त्वाचा भाग आहे. ही बाब लक्षात घेऊन भारताच्या संयुक्त वन व्यवस्थापन या संकल्पनेतून महाराष्ट्रात **संयुक्त सागरी मत्स्य व्यवस्थापन** राबविण्याचे प्रस्तावित आहे. भारताच्या वन विभागामार्फत संयुक्त वन व्यवस्थापनाद्वारे सामुदायिक सहभागामार्फत जंगलाचे संरक्षण करण्यात येत आहे. संयुक्त वन व्यवस्थापनाच्या संकल्पनेवर महाराष्ट्रात **संयुक्त सागरी मत्स्य व्यवस्थापन** हया धोरणाची आवश्यकता आहे. **संयुक्त मत्स्य संवर्धन या** उपक्रमाद्वारे शाश्वत विकासाची उद्दिष्टे (SDG) सह शाश्वत पध्दतीचे समर्थन लोक सहभागातून करण्याचे ध्येय्य मत्स्यव्यवसाय विभागामार्फत ठरविण्यात येत आहे. महाराष्ट्रामध्ये समुद्र व खाडी क्षेत्रात तसेच गोडया पाण्यातील भूजलाशयीन क्षेत्रात मोठया प्रमाणात मासेमारी केली जाते महाराष्ट्र राज्याचे सन २०२२-२३ चे एकूण मत्स्योत्पादन ५८९,८०० मे. टन होते यामंध्ये गोडया पाण्याचे मत्स्योत्पादन १४३,५४४ मे.टन असून सागरी मत्स्योम्पादन ४४६,२५६ मे.टन इतके आहे त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील मत्स्यजिवांचे तसेच मत्स्यव्यवसाया सबंधीत परिसंस्थेचे शाश्वत संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी संयुक्त मत्स्य व्यवस्थापनाचे दोन भाग करण्यात येत असून (१) संयुक्त गोडेपाणी भूजलाशयीन मत्स्य व्यवस्थापन हे भुजलाशयी क्षेत्रात व (२) सागरी क्षेत्राकरीता 'संयुक्त सागरी व्यवस्थापन ही संकल्पना राबविण्याचा मानस आहे.

**अ) संयुक्त भूजलाशयीन मत्स्य व्यवस्थापन**





महाराष्ट्र राज्यात लहान, मध्यम, मोठे जलाशय असून जिल्हा परिषद व मालगुजारी तलवांत मत्स्यव्यवसाय करण्यात येता. तसेच राज्यात असणाऱ्या लहान, मोठ्या, हंगामी तसेच बारमाही नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात मासेमारी केली जाते. राज्यात एकूण ४.१८ लक्ष हेक्टर क्षेत्र हे भुजलाशयीन क्षेत्र आहे. तसेच सुमारे १८००० कि.मी. लांबीचे नदी क्षेत्र आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात भूजलाशयीन मासेमारी केली जाते.

१) राज्यातील लहान मोठ्या नद्यांमध्ये तसेच तलाव व जलाशयांमध्ये

मोठ्या प्रमाणात स्थानिक प्रजातीचे प्रजनन पावसाळा च्या हंगामात होत असते. पावसाळी हंगामामध्ये या लहान व मोठ्या नद्या प्रजनक मासे प्रजननासाठी स्थलांतर करीत असतात, या स्थलांतराच्या कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात स्थानिक मच्छीमारांमार्फत प्रजनकांची मासेमारी केली जाते व त्यांना त्यांच्या नैसर्गिक प्रजननापासून रोखले जाते. यामुळे या माशांचे प्रजनन होण्याआधीच पकडले गेल्या असल्यामुळे स्थानिक प्रजातीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात राज्यात कमी झाल्याचे दिसून येत आहे व याचा. परिणाम गोड्या पाण्यातील मत्स्यव्यवसायांवर पर्यायाने राज्याच्या मत्स्योत्पादनावर दिसून येत आहे. याकरिता 'संयुक्त मत्स्य व्यवस्थापन' हे प्रभावी माध्यम ठरू शकते. लोकसहभागातून लोक जागृती करून प्रजनक वाचवणे शक्य आहे. त्यामुळे नैसर्गिक पध्दतीने मत्स्यसाठयाचे जतन करणे शक्य होईल.

२) महाराष्ट्र राज्यातील मोठ्या व लहान नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात देवडोह आहेत. नद्या वाहन असताना नदीच्या पात्रात अपक्षरणाथी (Erosion) क्रिया मोठ्या प्रमाणावर होत असते पावसाळयात नदी वाहन असतांना नदीच्या भौगोलिक क्षेत्रानुसार अपक्षरणाची (Erosion) क्रिया होऊन काही ठिकाणी मोठा खड्डा निर्माण होऊन त्यामध्ये बारमाही खोल पाणी साचून राहते, यास डोह /जलडोह/देवडोह असे संबोधले जाते, राज्यातील नद्या पावासाळ्यात पुराने वाहत असतात व उन्हाळ्याच्या सुमारास त्यातील देव डोहामध्ये स्थानिक मासे राहत अशतात. पाणी कमी झाल्यावर याडोहा मध्ये मासेमारी मोठ्या प्रमाणात सहज केली जाते. नदीचे पाणी कमी झाल्यानंतर स्थानिक प्रजाती देवडोहामध्ये पाणी असल्याने वास्तव्य करतात. या देवडोहामध्ये स्थानिक मच्छिमारांकडून सहजरित्या मासळी पकडली जाते. यामध्ये मोठ्या प्रमाणात मासेमारी केल्याने स्थानिक प्रजाती नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा देवडोहामधील माशांचे संवर्धन होणे अत्यावश्यक आहे. नदीच्या पात्रातील देवडोहाबाबत स्थानिक लोकांना आवश्यक असलेली माहिती विभागाद्वारे माहिती देऊन त्याचे मासळीचे संरक्षण व संवर्धन करणे हे काम संयुक्त गोडेपाणी मत्स्यसंवर्धन या संकल्पनेतून करणे शक्य आहे.

३) सध्या स्थितीत मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित थाई/आफ्रिकन मांगुर माशाचे पालन केले जाते. या माशांमुळे जैवविविधतेवर परिणाम होत आहे प्रतिबंध मांगुरच्या संवर्धनावर लोकसहभागातून संयुक्त मत्स्य व्यवस्थापनाद्वारे लोक जागृती करून यावर या माशाच्या संवर्धनावर प्रतिबंध करणे शक्य आहे. प्रतिबंधित मांगुरच्या संवर्धनावर शासनाकडून बंधन असल्याने या माशाचे पिलांची वाहतूक व साठवणूक रात्री-अपरात्री सुरु असते. स्थानिक लोकसहभागातून या वाहतूकी वर प्रतिबंध करणे सहज शक्य आहे. याकरता संयुक्त मत्स्य व्यवस्थापन च्या सहभागातून वाहतूक, साठवणुकीवर परिणामकारक बंधन घालणे शक्य आहे. या संयुक्त मत्स्य व्यवस्थापनाद्वारे मांगूर माशांच्या संवर्धनामुळे जैवविविधतेच्या दूरगामी परिणामाबद्दल जागरुकता निर्माण करुन लोकसहभागातून निर्णय घेऊन शाश्वत मत्स्य

व्यवस्थापनाचा करणे शक्य आहे.



Clarias Batrachus (Desi Magur)




Clarias Macrocephalus (Thai Magur)




Clarias Gariepinus (African Magur)

४) सद्यस्थितीत महाराष्ट्रात पंगेशीयस या प्रजातीच्या माशांसाठी मोठ्या प्रमाणात चिकन वेस्ट चे खाद्य म्हणून वापर केले जाते. चिकन वेस्ट हे निकृष्ट व खऱाब असल्याने याचा परिणाम माशांचा आरोग्यावर होत असल्याने, तसेच मानवाच्या आरोग्यावर सुद्धा परिणाम होण्याची दाट शक्यता आहे. या निकृष्ट खाद्यांमध्ये पंगेशियस माशांस मोठ्या प्रमाणात प्रतिजैविकांचा वापर करण्यात येत आहे व ते धोकादायक आहे. चिकन वेष्टच्या वापरावर प्रतिबंध घालणे अत्यंत आवश्यक आहे. याकिता संयुक्त मत्स्य व्यवस्थापनाद्वारे प्रतिबंध करून लोकसहभागातून व लोक जागृतीने हे कार्य करणे शाश्वत मत्स्यव्यवसाय पद्धतीसाठी शाश्वत संयुक्त भूजलाशयीन मत्स्य व्यवस्थापन हा उपाय हमी कारक असून महत्वपूर्ण भूमिका बजावणे शक्य आहे.






**ब) संयुक्त सागरी व्यवस्थापन**

महाराष्ट्राच्या लगत असलेल्या अरबी समुद्रात **संयुक्त मत्स्य यवस्थापन** उपक्रम राबविण्यात येणार आहे. याद्वारे लोकसहभागातून सामुदायिक पद्धतीने मत्स्य संपदेचे संरक्षण करण्यात येईल. या संयुक्त सागरी व्यवस्थापनाद्वारे मच्छिमार समुदायाच्या सहभागातून शाश्वत आणि जबाबदार मासेमारीच्या पद्धतीच्या समर्थन तसेच जबाबदार मासेमारीचा प्रचार करण्यात येईल.

१) संयुक्त सागरी व्यवस्थापनाच्या माध्यमातून पारंपारिक मासेमारी करणाऱ्या व्यक्तीच्या हिताचे संरक्षण करण्याचे आणि शाश्वत मासेमारीसाठी, मासेमारीच्या आकारमानाचे विनियमन करणे, लहान मासे व कोवळी मासे पकडण्याचे टाळणे यांसारख्या उत्तम व्यवस्थापन पद्धतींचा अंगीकार करुन मत्स्य साठ्याचे संवर्धन करण्यात येईल. याद्वारे शासनाने निर्गमित केलेल्या दि. ०२/११/२०२३ च्या शासन आदेशाचे पालन करणाऱ्यास परावृत्त करणे इ. बाबत संयुक्त व्यवस्थापन समितीद्वारे महत्त्वपूर्ण प्रयत्न



करण्यात येईल.





२)सागरी परिसंस्थेमध्ये सोडून देण्यात आलेले, हरवलेले व फेकून देण्यात आलेले मासेमारी जाळे मोठ्या प्रमाणात आढळतात. प्रत्येक वर्षी जगभरात १ लक्ष सागरी सस्तन प्राणी व कासवे तसेच १ दशलक्ष सागरी पक्षी यांचा मृत्यु अश्या मासेमारी जाळ्यामुळे होतो. मासेमारी वापरण्यात येणारे जाळे हे अविघटनशील आहे. सागरी परिसंस्थेमध्ये सोडून देण्यात आलेले, हरवलेले व फेकून देण्यात आलेली जाळी पर्यावरणास अतिशय घातक असते. याकरीता सदरची जाळी समुद्रात सोडून न देणे, अशी समुद्रातून जाळी बाहेर काढणे, याबाबत मच्छिमारांमध्ये जनजागृती करणे इ. कार्ये संयुक्त सागरी व्यवस्थापनाद्वारे लोकसहभागातून उत्तमरित्या करणे शक्य होईल.

३) कृषि व पदुम विभागाच्या दि २१/१२/२०१८ व दि.०८/०१/२०२१ च्या शासन निर्णयान्वये वन्यजिव संरक्षण कायदा अधिनियम १९७२ अंतर्गत ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन सी कासव, लॉगर हेड कासव, हॉक्सबिल कासव पॉक्यूपाईन रे (काटदेर पाकट), व्हेल शार्क, गैन्जेटीक शार्क, पाँडेचरी शार्क, सॉ फिश, जेंट गिटार फिश, लेटर बैंक कासव, डॉल्फीन व व्हेल शार्क (सर्व समुद्री सस्तन प्राणी यांस दुर्मिळ प्रजाती म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. या दुर्मिळ प्रजातीचे संरक्षण करणे आवश्यक आहे याकरीता स्थानिक मच्छिमारांच्या सहभागातून दुर्मिळ प्रजातीच्या संरक्षणासाठी पाठींबा प्राप्त करुन घेणे शक्य आहे. याबाबत राज्यातील स्थानिक किनारपट्टीवरील मच्छिमारांच्या संयुक्त सागरी व्यवस्थापनाद्वारे मच्छिमारांमध्ये सकारात्मक चर्चा घडवून सागरी परिसंस्थेचे शाश्वत संतुलन राखणे शक्य होईल.

४) शास्त्रीय तत्त्वावर मासेमारीचे नियमन करण्यासाठी आणि मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्या निरनिराळ्या वर्गातील व्यक्तींच्या आणि विशेषता पारंपारिक जाळी वापरुन मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी, मासेमारीवर नियंत्रण ठेवणे यासारख्या उत्तम व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करुन माशांचे जतन करणे आणि समुद्रावर कायदा व सुव्यवस्था राखणे, यासाठी पर्ससीन जाळी यांचा वापर करण्याऱ्या यांत्रिक तसेच पंत्रचलीत मासेमारी नौकांवर जनरेटर अथवा जनरेटरशिवाय चालणारी विनाशिकारी मासेमारी पध्दती, ज्यात बुल व पेअर ट्रॉलिंगचा समावेश आहे, तसेच पाण्याखाली बुडीत अथवा पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगते कृत्रिम दिवे/एलईडी लाईट माशांना आकर्षित करणारे दिवे किंवा कोणतीही इतर प्रकाश उत्सर्जित करणारी कृत्रिम साधने/ उपकरणे बसविणे अथवा त्यांच्या कार्यान्वयास दि.२७/०४/२०१८ च्या अधिसूचनेद्वारे प्रतिबंध

घालण्यात आला आहे. याबाबत स्थानिक मच्छिमारांच्या संयुक्त सागरी व्यस्थापनांद्वारे नैसर्गिक संसाधन आणि जैव विविधता संवर्धनाद्वारे सागरी उत्पादकता व वाढविणे व नैसर्गिक ससाधने संरक्षित करणे, याकरीता मच्छिमारांमध्ये मोठया प्रमाणात जनजागृती करणे आवश्यकता आहे. यांची उद्दिष्टे प्राप्त करुन घेणेसाठी स्थानिक मच्छिमारांचा सक्रीय सहभाग करून घेणे शक्य आहे.

५) मासळीच्या साठयाचे जतन तसेच मच्छिमारांची जिवित व वित्त यांचे रक्षण करण्याच्या हेतूने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अन्वये अंतर्गत दि.०१ जून ते ३१ जुलै या कालावधीमध्ये राज्याच्या जलधी क्षेत्रात यांत्रिक मासेमारी नौकास पावसाळी भासेमारी बंदी घालण्यात आली आहे. पावसाळी कालावधीत मासळीच्या जिवांना प्रजोत्पादनास पोषक वातावरण असते. या कालावधीत मासेमारी बंदीमुळे मासळीच्या बीज निर्मिती प्रक्रियेस वाव मिळून मासळीच्या साठयाचे जतन होते. तसेच या कालावधीत खराय/वादळी हवामानामुळे होणारी मच्छिमारांची जिवित व वित्त हानी मासेमारी बंदीमुळे टाळता येणे शक्य होते. मासळीच्या साठयाचे जतन व मच्छिमाराांची जिवित व वित्त हानी मासेमारी बंदीमुळे टाळता येणे शक्य होते. मासळीच्या साठयाचे जतन व मच्छिमारांची जिवित व वित्त हानी टाळणे याकरीता 'संयुक्त सागरी व्यवस्थापन एक महत्वाचे कार्य करू शकेल. लोक सहभागातून मासेमारीवर देखरेख आणि पाळत ठेवणे, बेकादेशीर व अवैध तसेच अनुचित व अनियन्त्रित मासेमारीचा सामना करण्यासाठी संयुक्त सागरी व्यवस्थापन हे मजबूत प्रणाली ठरु शकेल.

६) संयुक्त सागरी व्यवस्थापनाने स्थानिक मच्छिमार सहकारी संस्थेचा, त्यामधील मच्छिमार सभासद, स्थानिक ग्रामपंचायतीचा सहभाग करुन घेण्यात येणार आहे. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे राज्यातील सागरी जिल्हयांच्या लगत सागरी क्षेत्रात लहान मच्छिमारांचे उत्पन्न वाढविणेसाठी तसेच मत्स्यव्यवसाय पुनरुत्पादन करण्याच्या दृष्टीने १४५ कृत्रिम भित्तिका स्थापन करण्यात येत आहेत. सदरच्या कृत्रिम भितिका टाकल्यानंतर त्याचे संवर्धन, संरक्षण व देखरेख करण्याचे काम संबंधीत मच्छिमार सहकारी संस्था यांचेद्वारे संयुक्त सागरी व्यवस्थापनाद्वारे करण्यात येईल. संबंधित स्थानिक मच्छिमार सहकारी संस्थेस कृत्रिम भित्तिका दत्तक म्हणून देण्यात येईल. या संयुक्त सागरी व्यवस्थापन समितीने त्यांना प्राधिकृत केलेल्या कृत्रिम भित्तिकेची संपूर्ण जबाबदारी घेऊन त्यांचे संवर्धन, संरक्षण व देखरेख करावी. या कृत्रिम भित्तिकेच्या परिसरातील ५० मिटरच्या परिक्षेत्रात कोणत्याही मासेमारी नौकेस मासेमारीपासून परावृत्त करावे. याकरीता चारही बाजूस लाईट-बोये लावून इशारे लावण्याची







व्यवस्था करावी. याकरीता स्थानिक मच्छिमारांमध्ये जनजागृती करावी. कृत्रिम भित्तिके ही मासळीसाठी प्रजननाचे क्षेत्र म्हणून संबधीतानी स्वत:हून घोषित करावे.

७)सागरी परिसंस्थेतील प्लास्टिक प्रदूषण ही अतिशय संवेदनशील बाब आहे. प्लास्टिक जाळे हे अविघटनशील असून यामधून काही कालावधीनंतर बाहेर पडणाऱ्या विषारी घटकांमुळे मोठ्या प्रमाणावर सागरी प्रदूषण होते. सागरी परिसंस्थेमधील संयन झालेले प्लास्टिक ही जागतिक समस्या झाली आहे. या समस्येमुळे सागरी पर्यावरण व जैवविविधता यावर विपरित परिणाम होत आहे. महाराष्ट्र राज्याच्या समुद्रात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्या, बाटल्या, प्लास्टिक कचरा इ. आढळून येत आहे. यामुळे सागरी परिसंस्थेतील प्राणी व मासे यांस धोका निर्माण झाला आहे. यासाठी समुद्रात प्लास्टिक कचरा टाकण्यास जनतेस परावृत्त करणे, किनाऱ्यावर आलेला कचरा गोळा करुन त्याची विल्हेवाट लावणे, मासेमारी करतांना जाळ्यात येणाऱ्या प्लास्टिकचे नौकेवर गोळा करुन किनाऱ्यावर एकत्रित करुन त्यांची विल्हेवाट लावणे इत्यादीकरीता मच्छिमारांमध्ये जनजागृतीद्वारे सहभाग करुन घेणे व त्यांची अंमलबजावणी करणे संयुक्त सागरी व्यवस्थापनाद्वारे प्रभावशील कार्य ठरु शकेल.




कृत्रिम रिफ स्थापित करण्याकरीता ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा कार्यालयामार्फत एकूण १५८ स्थळांची अक्षांश-रेखांशाबाबतची माहिती प्राप्त झालेली आहे. तरी, जिल्हानिहाय कृत्रिम रीफ स्थापित करण्याकरीता प्रस्तावीत स्थळ संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | एकूण स्थळ निश्चित संख्या |
|---|---|---|
| १ | ठाणे | १७ |
| २ | पालघर | १५ |
| ३ | रायगड | ४५ |
| ४ | रत्नागिरी | ३६ |
| ५ | सिंधुदुर्ग | ४५ |
| | एकूण | १५८ |

# राज्यमासा - सिल्वर पॉमप्रेट - तांत्रिक समिती

कृषि व पदुम विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि – १५२३/प्र.क्र.३११/ पदुम-१४, दि. ०८ डिसेंबर २०२३ अन्वये "राज्यमासा सिल्व्हर पॉमफ्रेटचा अधिवास सुधारणे, संवर्धन व संरक्षण करणे याकरीता" उपाययोजना तयार करण्याकरीता मा. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर तांत्रिक समितीच्या कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहेत.

१)पापलेट माशाचा प्रजनन कालावधी व क्षेत्र इत्यादिचा अभ्यास करुन संवर्धन व संरक्षण करणे, याकरिता उपाययोजना तयार करणे.

२) डोल जाळ्याच्या खोलाच्या भागातील आसाचा आकार, दालदी जाळयाच्या आसाचा आकार याबाबत नियमन करणे, तसेच डोल व दालदी या जाळ्यांची व नौकांची संख्या निश्चित करणे.

३) लहान आकाराचे पापलेटची मासेमारी व विक्रीवर नियमन करणे.

४) संवर्धनाबाबत जनजागृती कार्यक्रम राबविणे.



पॅम्पस आर्जेन्टियस / सिल्व्हर पॉमफ्रेट
*(Pampus argenteus)* *(Silver Pomfret)*
स्थानिक नाव - पापलेट / सारंगा

| | |
|---|---|
| Kingdom | : Animalia |
| Phylum | : Chordata |
| Class | : Actinopterygii |
| Order | : Scombriformes |
| Family | : Stromateidae |
| Genus | : Pampus |
| Species | : *P. argenteus* |

५) भौगोलिक दृष्ट्या अभ्यास करून सिल्व्हर पापलेट या माशाला मानांकन प्राप्त होण्यासाठी आवश्यक अभ्यास करुन अहवाल सादर करणे.

राज्य माशाचा दर्जा असलेल्या पापलेट (सिल्व्हर पोम्प्लेट) या मत्स्य प्रजातीचे जतन होण्याच्या दृष्टी उपाययोजना सुचविण्यासाठी दि.०८/१२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापित तांत्रिक समितीची पहिली बैठक दि. १३/०२/२०२४ रोजी पार पडली. सदर बैठकीत राज्य माशाचा दर्जा असलेल्या पापलेट (सिल्व्हर पोम्प्लेट) या मत्स्य प्रजातीचे जतन होण्याच्या दृष्टीने काही उपाययोजना सुचविण्यात आल्या त्या खालीलप्रमाणे:

१) सागरी मासेमारी चिरकाळ शाश्वत ठेवण्यासाठी शास्त्रोक्त पध्दतीने व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने

जाईन्ट फॉरेस्ट मॅनेजमेंटच्या धर्तीवर 'जोईन्ट सी मॅनेजमेंट' (JSM) ची संकल्पना राबविणे.

२) प्रजनन हंगामानंतर माश्यांच्या पिल्लांचे संवर्धन करण्याकरीता केंद्र क्षेत्रिय प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत कृत्रिम रिफ (Artificial reefs) उभारणी राज्यातील ७ किनारी जिल्ह्यांतील सागरी क्षेत्रात एकूण १४५ कृत्रिम रिफ (Artificial reefs) ठिकठिकाणी उभारणी होणार आहे.

3) Triangular Reef Module पापलेटसाठी सहाय्य भूत आहे. त्यांचे प्रमाणात वाढ करावी. सद्य:स्थितीत केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे Grouper-60 : Triangular-80: Weil ring-60, या प्रमाणात स्थापित करावी. त्यामध्ये पापलेट संवर्धनासाठी Grouper-50: Triangular-100: Well ring-50 याप्रमाणे कृत्रिम रिफ रिफ (Artificial reefs) ची स्थापना करावी.

५) जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात आणखी १० ठिकाणी सदर कृत्रिम रिफ (Artificial reefs) स्थापन करण्यासाठी निधी मागणी साठी संबंधीत जिल्हयांचे सहायक आयुक्त यांनी प्रस्तावीत करावी.

६) प्रत्येक कृत्रिम रिफ (Artificial reefs) च्या ठिकाणा पासून १०० मिटर व्यासाचे अंतर Geo Mapping करुन बलुन बोयाद्वारे सिमांकीत (Demarcation) करावीत व सदर क्षेत्र 'मरीन बायो रीजर्व पार्क संबोधुन ते मासेमारी निषिद्ध क्षेत्र (No Fishing Zone) म्हणून घोषित करण्यात यावे.

७) समुद्रातील संरक्षित दुर्मिळ प्रजातीचे संवर्धन, LESS ABUNDANT झालेल्या वाणिज्यिक मत्स्य प्रजातीचे संवर्धन उदा. सिल्वर पापलेट इत्यादी, लोकसहभागातून करण्याच्या दृष्टीने करण्याच्या स्थानिक मच्छीमार सहकारी संस्थांना मरीन बायो रीजर्व पार्क चे व्यवस्थापन क्षेत्र दत्तक घेण्यास प्रवृत्त करणेबाबतची कार्यवाही करावी. सदर मच्छीमार गावा समोरील जलधी क्षेत्रात असणाऱ्या मरीन रीजर्व पार्क क्षेत्र वगळुन उर्वरीत क्षेत्रात संबंधीत असणाऱ्या संस्थेच्या सभासदांना MLS च्या वापर करुन मासेमारीसाठी मुभा राहील.

८) सिल्वर पापलेट ह्या राज्य माशाचे शाश्वत व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने संयुक्त समुद्र व्यवस्थापन ही संकल्पना राबविणे. त्यासाठी स्थानिक मच्छीमार सहकारी संस्थांच्या माध्यमातून, समुद्रात स्थापित करण्यात येणाऱ्या कृत्रिम रिफच्या संवर्धन व संरक्षणासाठी संयुक्त समुद्र व्यवस्थापन समितीस सहभागी करुन घेण्यात येईल. प्रती कृत्रिम भित्तीका (Artificial reefs) या प्रमाणे रु.१.०० लक्ष याप्रमाणे व्यवस्थापन निधी संबंधित मच्छिमार सहकारी संस्थांना मंजूर करण्यात येईल.

**'संयुक्त सागरी व्यवस्थापन' (जोईन्ट सी मॅनेजमेंट) ची संकल्पना**

संयुक्त सागरी मत्स्य व्यवस्थापनाचे (Joint Fisheries Management) विस्तारीत रूप अधिक परिष्कृत रुपामध्ये विकसित होते ते संयुक्त सागरी व्यवस्थापन Joint Sea Management रुपामध्ये.या अंतर्गत सुंदर, स्वच्छ सागरी किनारे असावेत, मासेमारीशी संबंधित नसले तरी शार्क, डॉल्फिन, ऑलिव्ह रिडले सारख्या प्रजातींच्या कासवांचे जतन, संवर्धन व्हावे, जलक्रीडा म्हणजे Water Sports च्या माध्यमातुन जल पर्यटनाला वाव मिळावा आणि या सगळया गोष्टींतून मासेमारी व्यवसायातील लोकांना एक अतिरिक्त उत्पन्नाचा स्त्रोत उपलब्ध व्हावा हा उद्देश आहे. त्याचप्रमाणे सागराच्या निर्मलतेकरीता डिझेल ऐवजी सी.एन.जी. किंवा बॅटरीवर चालणाऱ्या, विशेषत: सोलरवर चार्च होणाऱ्या बॅटरी संचालित बोटींना प्रोत्साहित करणे, बोटि बांधताना बायो डायझेस्टर टॉयलेटचा व पर्यावरण स्नेही धातूचा वापर करणे यासारखा बाबींचा यात समावेश होतो. यामध्ये सागरी किनाऱ्यावर असणाऱ्या सर्व लोकासंख्येचाच समावेश होतो. केवळ मासेमारी करणाराच वर्ग नव्हे तर जलक्रिडा, जलवाहतूक व जलपर्यटन या क्षेत्राशी संलग्न असणाऱ्या संपूर्ण समुदायाचीच ही जबाबदारी बनते. या संकल्पनेतून निर्मल सागर अभियान हे निर्मल सागर सुंदरम अर्थात निर्मलताच सागराचे खरे सौंदर्य आहे या संकल्पनेतुन राबविण्यात येत आहे.

संयुक्त वन व्यवस्थापन (Joint Forest Management(JFM)) धर्तीवर सुरू करण्यात येत असणाऱ्या या दुसऱ्या संयुक्त मत्स्य व्यवस्थापन अर्थात Joint Fisheries Management शिवाय Joint Sea Management (JSM) वच्या संकल्पनेचा सुरूवात महाराष्ट्र राज्यात करण्यात आली आहे.

वन मंत्री म्हणून मी Joint Forest Management च्या संकल्पनेशी चांगला परिचित आहे आणि आता मत्स्य विकास मंत्री म्हणुन दुसरा JFM म्हणजे Joint Forest Management संयुक्त मत्स्य व्यवस्थापन संकल्पना अंमलात आणतांना मला अत्यंत आनंद होत आहे. या अंतर्गत संयुक्त भूजलाशयीत मत्स्य व्यवस्थापन (Joint Forest Management (JIFM) आणि संयुक्त सागरी व्यवस्थापन (Joint Forest Management (JIFM) असे दोन भाग या व्यवस्थापनाचे आम्ही राबवित आहोत याशिवाय एक सामजिक उत्तरदायित्व म्हणुन संयुक्त सागरी मत्स्य व्यवस्थापन (JIFM) च्या पलिकडे एक संयुक्त सागर व्यवस्थापन (Joint Sea Management (JSM) हा ज्या प्रमाणे Joint Forest Management मध्ये वने या संसाधनाचा प्रतिपाळ केला जातो तसा जलस्त्रोताचा विशेषत: सागरी जलाचा येथे प्रतिपाळ करण्याच्या हेतुने नवीन संकल्पनेचा शुभारंभ करत आहोत. वने आणि जल ही दोन नैसर्गिक संसाधने आहेत. तशी नैसर्गिक ठेवली, प्रदुषित केली नाही तरचे मानवजातीचे भवितव्य आहे ही बाब या जनता भागितारीतेमागे

आहे.

महाराष्ट्र राज्याला ७२० कि.मि.लांबीचा समुद्र किनारा लाभला असून समुद्र किनारी वसलेल्या मच्छीमार गावातून सागरी मत्स्यव्यवसाय केला जातो. सागरी मासेमारी चिरकाळ शाश्वत ठेवण्यासाठी शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने जॉईन्ट फॉरेस्ट मॅनेजमेंटच्या धर्तीवर जॉईन्ट सी मॅनेजमेन्ट (JSM) ची संकल्पना राबविणेसाठी तत्वे निर्धारीत करण्याची आवश्यकता आहे. तसेच त्याअनुषंगाने प्रत्येक सागरी किनारा असलेल्या महसुली गावांसाठी संयुक्त सागरी मत्स्यव्यवसाय संवर्धन सहव्यवस्थापन समितीचे गठन करणे व त्यांची उद्दिष्टे, कर्तव्ये व जबाबदारी, कार्यक्षेत्र ठरवणे आवश्यक आहे. त्यासाठी गावस्तरीय समिती गठीत करणे आवश्यक आहे.

राज्याचे सागरी व खडी क्षेत्रालगत असलेल्या मच्छीमार गावातील / नागरी समूहातील मच्छीमार गावांमध्ये जर सागरी मासेमारी क्षेत्रावर अवलंबून असलेल्या व्यक्ती / मछिमारी समाज / अन्य समाज असेल तर अशा ठिकाणी संयुक्त सागरी व्यवस्थापन समिती गठीत करुन सदस्यांचे सामूहिक उत्पन्न वाढवण्यासाठी आणि समुद्राचे प्रभावी संरक्षण त्यांचे माध्यमातून करण्यासाठी सन २०२४-२५ या कालावधीत सागरी मत्स्यव्यवसाय संवर्धन प्रकल्प स्वरुपात (Project Mode) राबविण्यात येईल.

**प्रकल्पाची उदिष्टे :**

१) सागरी मासेमारी चिरकाळ शाश्वत ठेवण्यासाठी शास्त्रोक्त पध्दतीने व्यवस्थापन.

२) नियोजनबद्ध व्यवस्थापनामध्ये अवलंबून असलेल्या ग्रामस्थांचे योगदान घेणे व त्यांच्या उपजिविका साधनांचा विकास करणे.

३) मत्स्यव्यवसाय विभाग व स्थानिक जनता यांच्यातील सहजीवन वाढवून परस्पर सहकार्य वृध्दींगत करणे.

४) त्यासाठी अवलंबितत्व असलेल्या गाव समूह तयार करुन अशा संस्थां शासन व संशोधन संस्था इत्यादीमध्ये करारनामे करणे, सदर क्षेत्राबाबत सूक्ष्म व्यवस्थापन आराखडा (Micro Plan) तयार करणे, सदर समूहांना आवश्यक प्रशिक्षण देणे.

५) योजनेच्या माध्यमातून प्राप्त होणारे उत्पन्न मत्स्य संवर्धन व सदर समूहाच्या विकासासाठी वापरणे.

६) केंद्र/ राज्य शासनाच्या विविध विभागांच्या योजनेतील तरतुदींची सांगड (Convergence) घालणे.

**२. प्रकल्पाची अंमलबजावणी :-**

२.१) ‘संयुक्त सागरी व्यवस्थापन' प्रकल्प व सागरी मत्स्यव्यवसाय संवर्धन सह व्यस्थापन समिती

आयुक्त मत्स्य्यवसाय विभाग मुंबई यांचे नियंत्रणाखाली राहील. योजनेचा वार्षिक आराखडा तयार करणे, आवश्यक निधीची मागणी करणे व वितरीत करणे, कामांचे मूल्यमापन करणे, प्रकल्पात आवश्यक बदल असल्यास पूर्व मान्यतेने बदल करणे व त्याबाबत शासनास आवश्यक तो अहवाल सादर करणे, प्रकल्पाचे सर्वसाधारण नियंत्रण करणे इत्यादी बाबी त्यांच्या अधिनस्त राहतील.

२.२) ज्या गावचे / वस्तीचे क्षेत्रात समुद्र आहे, तेथे सामूहिक स्वरुपाचे फायदे देण्यासाठी मच्छीमार समुह व मच्छीमार सहकारी संस्थाचे बळकटीकरण करुन गरजे नुसार प्रकल्पाची उभारणी करुन सागरी मत्स्यव्यवसाय संवर्धन योजना ' योजना राबवण्यात येईल. यासाठी संयुक्त व्यवस्थापने समिती स्थापन करण्यात येईल. सदर समितीची एक कार्यकारिणी अस्त्वित्वात राहील.

## संयुक्त सागरी मत्स्य व्यवस्थापन समिती

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्ह्याचे मत्स्यव्यवसाय विकास अधिकार/मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी | अध्यक्ष |
| २ | मच्छीमार सहकारी संस्थेचे चेअरमन | सदस्य |
| ३ | पारंपारिक मच्छीमारांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | गावातील ग्रामसेवक | सदस्य |
| ५ | बंदर पर्यवेक्षक | सदस्य |
| ६ | सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (परवाना अधिकारी) | सदस्य सचिव |

सदर **संयुक्त सागरी व्यवस्थापन समिती-** शाश्वत मासेमारी व उपजिविका संदर्भात शासनाच्या सागरी मासेमारी/मत्स्योत्पादन वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या खालील विविध योजना बाबत जिल्हा मत्स्यव्यवसाय कार्यालय व संबंधित मच्छीमारी गाव/लाभार्थी संस्थामधील सिनयंत्रणाचे (दुव्याचे) काम करेल.

१)स्वच्छ सागर निर्मळ सागर

२) "Promotion of Sustainable Fisheries and Livelihood through Artificial Reefs" च्या द्वारे उभारणी केलेल्या कृत्रिम भित्तीका चे व्यवस्थापन करणे.

३)समुद्री शेवाळ/कालवे व शिंपले पालन

४)समुद्रामध्ये पिंजऱ्यातील मत्स्यपालन

५)सी रेन्चींग (Sea Ranching)

६)समुद्री किनारी मत्स्य पर्यटन विकास

७)समुद्रात / खाडीत/ नदीत किनारी भुत जाळे/ प्लास्टीक निर्मुलन

८)शाश्वत मासेमारी व उपजिविका संदर्भात योजनेचा प्रचार करणे व जनजागृती करणे.

९)Climate Resilient Coastal Fisherman Village" साठी विविध योजना सुचविणे.

१०)संरक्षित दुर्मिळ सागरी प्रजाती बाबत जनजागृती

११)पावसासाठी मासेमारी बंदीबाबत जनजागृती

१२) सागरी मासेमारी नियमन अधिनियम सुधारणा २०२१/अवैध मासेमारी पद्धती

## "स्वच्छ सागर - निर्मल सागर"



# NOTE

